# प्रतिमा इंगोले यांच्या कथासाहित्यातील स्त्री दर्शन

*डॉ. शकुंतला भारंबे

वऱ्हाडी बोलीतील सुप्रसिध्द कथालेखिका प्रतिमा इंगोले या अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या असून त्यांच्या कथाकथन व कथालेखनाने महाराष्ट्राला विशेषतः विदर्भाला चांगल्याच परिचित आहेत. प्रतिमा इंगोले यांचे सात कथासंग्रह प्रसिध्द झालेले आहेत. त्यांच्या बहुतांशी कथा **स्त्री** हया केंद्राभोवतीच विणलेल्या आहेत. स्त्री आणि व्यथा हाच त्यांच्या कथांचा चिंतनाचा विषय आहे. लेखिकेच्या कथेतील स्त्री म्हणजे दु:खाचे,कष्टांचे, दारिद्रयाचे, वात्सल्याचे, मूर्तरुपच होय. प्रतिमा इंगोले यांचे कथालेखन विपुल प्रमाणात असल्याने त्यांच्या सुरुवातीच्या कथांतील आणि अलिकडच्या कथांतील स्त्री प्रतिमांचा अविष्कार बदलता असून वेगवेगळया स्वरुपाचा आहे. त्यांच्या प्रारंभीच्या कथांतून भोळया-भाबडया, अज्ञानी, अंधश्रध्दाळू स्त्रिया साकार झालेल्या आहेत. त्या स्त्रियांच्या ठिकाणी असलेल्या श्रध्दा व समजूतीतून त्यांची मानसिकता त्यांनी प्रकट केली आहे. लोकपरंपरेचा स्वीकार करणाऱ्या स्त्रीची भावावस्था दर्शविली आहे. सण हरकी तसेच गरीब शेतमजूर स्त्रीची अवस्था प्रकट केली आहे. सासू-सुनेतील व नणंदेतील नाते, त्यांच्यातील बेबनाव यावर प्रकाश टाकलेला असून सुनेचा छळ कसा होतो हे ही सांगितले आहे.

**हजारी वेलपान** त्या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहात वऱ्हाडी ग्रामीण जीवनाचे स्त्रीमनाचे असंख्य पदर हळूवारपणे आणि ते सुध्दा बावनकशी स्वरुपात सादर केलेले आहेत. स्त्री मनाचे सुक्ष्म वास्तव दर्शन घडविले आहे. **मियॉ बीबी राजी** या कथेत आलेले नातेसंबंध मुलगा-जावई, व्याहीव्याही आणि मुलीचा चुलता असे असून किरकोळ कारणावरुन व्याहया-वाहयामध्ये वाद आहेत. पती -पत्नीला मात्र सहजीवनाची ओढ व आकर्षण आहे. त्यांच्यात काही तणाव नाही. त्यांचे परस्परांवर प्रेम आहे. वडिलांच्या हेकडपणामुळे पुष्पाला माहेरी यावे लागते. ती मात्र सारखे आपल्या पतीचेच स्वप्न पाहते ती म्हणते - लगन झाल्यापासून मले वाटे, देवा हे दुनिया कितीक साजरी होय. हया अभयातल्या चान्र्या. हे झाडावरचें फुलं कितीक साजरे दिसतात नायी ? घंटोनसी मले नदीवर जावाव वाटे. आन नदीच्या पाण्यात पाय डुबून तिचं झुयमूय वायनं पावाव वाटे. (१)

अशा या मनस्थितीत असलेल्या पुष्पाची नवथर भावना कितीतरी आकार धारण करते व नवविवाहीतेचे पतीला भेटण्यास आतुर झालेले मन साकार होते. खेडयातील स्त्रियांच्या जीवनाला प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथातून उजागर केले आहे. करणी कवटाळवर विश्वास असलेल्या स्त्रिचे **ठाणंबाई अवचित** या कथेतून साक्षात दर्शन घडविले आहे. या कथेतील स्त्रीला प्रत्यक्ष फसवेगिरीचा अनुभव आल्यानंतर अज्ञान व अंधश्रध्देपासून शहाण्या झालेल्या स्त्रीचे मनोदर्शन यातून घडते. वेळीच जागृत झालेली ग्रामीण स्त्री वाचकांच्या डोळयांसमोर उभी राहते. तसेच छोटया कुटूंबाचे महत्व जाणणारी ग्रामीण स्त्री त्यांनी आपल्या कथांतून साकार केलेली आहे. आपला नवरा गावोगावी छोटे कुटूंब सुखी कुटूंब मोहिम राबवितो व स्वतः मुलगा होण्याची वाट बघतो तर घरापासूनच मोहिमेची सुरुवात का करु नये असा विचार करुन ती स्वतः कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेते.

**अकसिदीचे दाने** विदर्भातील अस्मितेचे संस्कृतीचे रितीरिवाजांचे दर्शन घडविणारा ग्रामीण संग्रह आहे. शेती व्यवसाय कर्मकांडात्मक जीवनातील पारंपारिकता, लग्नकार्यात हुडयांमूळे आलेले विघ्न, गावकीतील भाऊबंद व त्यांची भांडणे, शिक्षणासाठी आसुडलेली नवी पिढी, घरकामाच्या रेटयाखाली दबलेल्या स्त्रिया, गावातील गुंडगिरी असे कितीतरी अनुभवांचे कथन त्यांच्या कथेतून खास अशा वैदर्भीय बोलीतून येते.

**सर्वा** या कथेत विधवा स्त्रीची फसवणूक करुन तिच्या कडून पैसे काढून घेतले जातात. व तिला माहेरी पाठविले जाते. मिलटरीत असलेल्या कांताचा नवरा लढाईत शहीद होतो. तिला विम्याचे पैसे मिळतात परंतु तिचा दिर तिला फसवून पोष्टातून पैसे काढून घेतो. शेवटी त्याचारीचे जीवन तिच्या पदरी येते. अनाडीपणामुळे आपले आयुष्य मातीमोल झाले म्हणून तिला वाटते. मले वाटे पोटटीनं शिकावं तिच्या बा सारखं मोठं व्हावं आपल्यात आयिष्याची या अळातपनानं निऱ्हा माती झाली. आयिष्य निऱ्हा वावरातल्या मातीत आंगाले माती लागू लागू गेलं. (२) मुलीला चांगले शिक्षण द्यावे म्हणुन शाळेत घालते मुलीने तिच्या वडीलाप्रमाणे शिकुन . मोठठ व्हावे अशी ईच्छा मनी बाळगते म्हणजेच तिला शिक्षणाचे महत्व कळले आहे. याची जाणिव तिला होते. रुढी, परंपरा यांची जपणूक करणाऱ्या स्त्रीच्या मनाची उलघाल **सोन्याचा गोफ** या कथेत स्पष्ट केलेली असून पुरुषप्रधान संस्कृतीत विशेषतः ग्रामीण समाजात कष्टकरी विवाहीत स्त्री परित्यक्ता असून ती नवऱ्यापासून उपेक्षित आहे. तिच्या मनाची घुसमट होणारी आहे. तिची कुचंबणा व विटंबनाही होत आहे. कारण ती आजही परावलंबी जीवन जगणारी आहे. कष्ट करुनही तिला आर्थिक स्वातंत्र्य नाही. ती नवऱ्याच्या हारातील कळसुत्री बाहुली असून त्याची दासी आहे. तिच्या वाटयाला येणाऱ्या कुंचबणेविरुध्द उभे राहण्यास ती घुसमते तरी ती नवऱ्याकडून अल्प अपेक्षा पूर्ण होण्यावरही समाधान मानते. परंतु ते अल्पसंतुष्टपणही तिच्या वाटयाला येत नाही. कारण ती पुरुषप्रधान संस्कृतीत दबोजली गेली आहे. अशा दु:खी कष्टी स्त्रियांच्या जीवनातील विविध प्रसंग व क्षण प्रतिमा इंगोले यांनी टिपले आहे. **जावयाचं पोरं** या संग्रहातून त्यांनी स्त्री-पुरुष नातेसंबंधातील एकेक धागा त्यांनी उलगडून दाखविलेला आहे. स्त्री विषयक जाणीवांचा एक मोठा पट साकार झालेला दिसून येतो. त्याच्या बाहेरख्यालीपणामुळे तिला त्रास होतो आणि वैवाहिक जीवन विस्कटले जाते. त्यातून तिला सुटका करुन घ्यावीशी वाटते. नवऱ्याच्या बदफैलीपणामुळे फुसफुसणारी, सहनही करणारी, अनेक प्रश्नांच्या कल्लोळात गुदमदणारी आतला कल्लोळ शांत करण्यासाठी बाहेर कल्लोळ व संघर्ष

*कला, वाणिज्य व कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन, महिला महाविद्यालय, डोगर कठोरे, जळगांव

करु पाहणारी विवाहिता **कल्लोळ** कथेत भेटते. तर **दुपवा** या कथेतील समरतीचा नवरा एका निवडणूकीत स्त्रीवेष धारण करुन नाचतो. नवऱ्याच्या बायकीपणाची तिला किळस व घृणा वाटते. रात्री दारुच्या नशेत तो तिचा जबरी भोग घेतो आणि गर्भवती समरतीला दुपवा जातो जसे - समरती त्याही अवस्थेत तोल सावरीत उठली. प्रयत्न पूर्वक उभी राहिली आणि पचकन नवऱ्याच्या शरीरावर थुंकून दाराकडे निघाली.------- तशाच रक्त भरल्या अवस्थेत ! तिला दूर जायचे होते. ------त्याच्यापासून शक्य तितक्या दूर..........आणि भेलकांडत लटलटणाऱ्या पायांनी ती चाललीच होती दुर........दुर.......(३) स्त्री म्हणजे उपभोगांच साधनमूल्य मानून तिच्या शरीराला स्थान देणाऱ्या पुरुषी प्रवृत्तीमुळे तिच्या वाटयाला निरातिशय दुःखाची कल्पना यातून येते आणि स्त्री शरीरकेंद्रित अनुभवाची दाहकता मनाला जाऊन भिडते.

ग्रामीण जीवन, त्यातील जीवनमुल्ये, माणसामाणसातील माणुसकीचे संबंध या सर्वांची परिवर्तनाच्या झपाटयात मोठया वेगाने पडझड होत आहे. ग्रामीण जीवनातील सगळयात स्तरातील स्त्रियांची अगदी मोठया वाडयातल्या पाटलिणीपासून ते मांगिणीपर्यंतची दुःखे लेखिका या कथातून प्रकट करते. केसर ही गरिबाघरची तर तिची जेठानी श्रींमताची मुलगी म्हणून केसरला दिवसभर मोलकरीन सारखं राबावं लागतं. सासूचा पारा व नवऱ्याचा मारा ही केसर सहनशील व सोशीक वृत्तीने सहन करते आपली व्यथा ती बोलून दाखवते. बानं मले हया मोठया घरी दिवून कायीच खरं केलं नायी बयनां? त्याच्यापरस गरिबाले देलं असतं त पुरलं असतं त्याले तरी ठसठस लागलं असतं? घर मोठ काय आनं त्यानं काय? आपल्याले त सारकंच हाये. आपल्याले त धद्यांतच मरा लागते त्यात हया मोठया घरी आपल्यालेच मन मारा लागते. एकही गोठ मनासारखी होत नायी ना मोठ घर हाये त कोनतच सुख नायी हे हेच्यापक्सी धावनं आन खान पुरते. (४) ग्रामीण भागातील श्रीमंत घराण्यात पडलेल्या स्त्रीचे परावलंबच, तिचे दुःख आणि तिची घालमेल यातून व्यक्त होते.

**हुबतीची पावलं** या कथेत शेतकरी जसा नैसर्गिक आपत्तीने झोडपला जातो तसा समाज व्यवस्थेनेही भरडून, पिळून निघतो. अशा असहाय शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न कापूस विक्रीचे पैसे वेळेवर उपलब्ध न झ ाल्याने मोडते. शेतकऱ्यांची केविलवाणी स्थिती होते. आपल्यामुळेच बापावर असा बिकट प्रसंग ओढवला अशी समजूत मुलीची होते व ती आत्महत्या करते. याच्या उलट **सपन** या कथेतील तरुणी शिक्षण घेतलेली असल्याने स्वतःच्या क्षमता ओळखणारी आहे. म्हणूनच ती हुंडयासाठी रुसणाऱ्या नवरदेवाबरोबर लगीन करायला नकार देते व आपल्या बापाला बजावते. बापू ! तुमी तो गोफ निवू नका मी शेवटचं सांगतो. नायी तर मी आळात उडी मारतो. (५) अशी खंबीर मनोवृत्तीची स्त्री साकार होते.

बदलत्या समाजव्यवस्थेत संघर्षमय जीवनाला आव्हान देत झुलणारे जीवन पंचफुलाच्या नशिबात येते. चार मुली व एक मुलगा असूनही ती निराधारपणे जीवन जगत असते. दुसऱ्याच्या घरची धुणी-भांडी करत नवऱ्याचे व आपले पोट भरते मुलाने अव्हेरलेली असली तरी नवऱ्याबरोबर ती खंबीरपणे जीवनाला सामोरी जाते. बेघर पती-पत्नी गाडया मडक्याचा संसार पाठीवर बिऱ्हाड घेऊन आप्सरा शोधतात.

**भिंगरी** या कथेतील गंगाबाई माहेरी येऊन राहते. तिच्या वडिलांच्या मिळालेल्या जागेत आपल्या दोन मुलांचा संसार थाटून देते. परंतु चुलता श्रीमंतीने उन्मात्त होऊन तिच्या जागेत अतिक्रमण करुन माडी बांधतो. जागेवरुन गंगाबाईचा मुलगा व तिचा चुलता यांच्यात भांडण होते. ती पोलीस स्टेशनात जाते तेव्हा तिला न्याय मिळत नाही. तिचे म्हणणे एकून घेतले जात नाही. मुलाच्या जीवनासाठी भिंगरीसारखी फिरणाऱ्या गंगाबाईचे मानवी मनाचे कप्पे उलगडून दाखविले आहे. तसेच मनातील स्वप्नांची मनोरे उध्वस्त होत गेलेल्या स्त्रियांची व्यथा, स्त्रीचे घुसमटणारे मन, नवऱ्याकडून त्यांचा होणारा अपेक्षाभंग तिची कुचंबणा व तिची घालमेल आणि तिच्या उपक्षेने बनलेले तिचे मनोव्यापाराचे साक्षात दर्शन लेखिकेने घडविले आहे. **पुलाचं वावर** या कथेतील नवऱ्याने व्यवहाराच्या वेळी आपलाल्या विश्वासात घेतले नाही म्हणून विवाहितेचे भावविश्व कोसळते आणि तिला अस्वस्थ वाटते या संदर्भात लेखिकेने लिहीले आहे की,

नदीला अचानक येणाऱ्या पहिल्या पुरागत दुःखाच्या आवेग ओसंडत आला ती अक्षरशः गुदमरु लागली, पण हे दुःख कशाचं असांव? ही मरगळ, ही अस्वस्थता, ही कासावीस कशाची असावी? नवऱ्याने तिला विश्वासात घेतले नाही त्याची? हो खरेंच त्याने विश्वासात घ्यायला हवे होते. शेवटी दोघं सहधर्मचारी होते. एकमेकांना विश्वासात घेऊन त्यांनी वाटचाल करायला हवी होती, पण असं होतं नव्हतं. (६) पुरुषप्रधान संस्कृतीत कुटूंबकर्ता पुरुष असल्याने आपल्या मनाप्रमाणे व्यवहार करतो. पत्नीला स्थान देत नाही. की तिचा विचार घेत नाही . किमान नवऱ्याने आपल्या मनाचा विचार करावा असे तिला वाटते पण तसे घडत नाही. म्हणून प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथांतून वऱ्हाडी ग्रामीण स्त्री चे जीवन साकार केले असले तरी या स्त्रियांच्या व्यथा-वेदनांचे स्वर अखिल स्त्री जातीच्या दुःखापेक्षा वेगळे नाही. त्यात काही प्रयोगशिलता आढळत नाही, तर प्रदेश चित्रणाच्या दृष्टीने स्त्रीकेंद्रित अनुभव त्यातून व्यक्त झालेले आहेत.

स्त्रीच्या अपेक्षा अगदी साध्या असल्या तरी त्या पूर्ण होऊ शकत नाही. एवढेच नाही तर प्रसंगी नवऱ्याच्या चुकाही पदरात घालते . प्रतिमा इंगोले यांनी स्त्रीजीवनातील विविध पैलुंवर प्रकाश टाकतांना वास्तवतेला मुरळ घालून कल्पकतेचा आधार घेतलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कथा, आदर्श, बोधवादी, आणि सुचकतादर्शक बनलेल्या आहे. म्हणून वस्तुनिष्ठतेच्या मर्यादा **हिरवे स्वप्न** या कथासंग्रहातील काही कथांना पडलेल्या आहेत. त्यांच्या कथेतील स्त्रीला स्वतःच्या स्त्री अस्तित्वाचे भान आलेली, आधुनिकतेची जाणीव झालेली, पुरुषाला त्या भानाची स्पष्टपणे जाणीव देणारी, स्वतःवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणारी स्त्रीचे चित्र रेखाटलेले आहे.

## संदर्भ ग्रंथ

१. हजारी बेलपान : प्रतिमा इंगोले, पंजाबराव इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर, दि.आ. १९९४ पृष्ठ १० २. अकासिदीचे दाने : प्रतिमा इंगोले (सर्वा), पंजाबराव इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर, दि.आ. १९९४ पृष्ठ ३३ ३. जावयाचं पोरं : दुपवा प्रतिमा इंगोले, पंजाबराव इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर, प्र.आ. १९८९, पृष्ठ ६१ ४. लेक भुईची : परायाची लेक, प्रतिमा इंगोले, श्री. पंजाबराव इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर, दि.आ. १९९५ पृष्ठ २८ ५. लेक भूईची : सपन, प्रतिमा इंगोले, श्री. पंजाबराव इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर दि.आ. १९९५ पृष्ठ ८० ६. हिरवे स्वप्न : पुलाचं वावर, प्रतिमा इंगोले, श्री. पंजाबराव इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर, प्र. आ. १९९४, ३ पृष्ठ १६